**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६५६/२०२२</u>**

जुना नियमित दिवाणी दावा क्र. १५९/२०१८

रुपाली सुनिल दहिवाळ व इतर वि.

महेंद्र ज्ञानेश्वर अडगळे व इतर

CNRNOMHSO100023052022

**<u>निशाणी ७० खालील आदेश</u>**

(<u>दिनांक– ०७/०२/२०२४</u>)

दाव्याच्या कामाकाजासाठी व वादीचा उलट तपास घेण्यासाठी दि.३०/११/२०१८ रोजी अकलूल पोलीसांनी घडलेल्या प्रकाराबद्दल केलेला रिपोर्ट न्यायालयात मागवून घेण्यासाठी अर्ज केला आहे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, न्यायालयाने अर्ज नि.क्र.२७ पोलीस संरक्षणाचा मंजूर केला, त्याप्रमाणे दि.३०/११/२०१८ रोजी वाद मिळकतीत सकाळी ११.०० ते १२.०० च्या दरम्यान देवीचंद कुणीलाल ओस्वाल व इतर यांनी कटर मशीनने कुलूप कापणारा खुदाबक्ष तांबोळी व इतर यांनी संगनमताने प्रतिवादीच्या खरदी मालकी वहिवाटीचे मिळकतीस प्रतिवादीने लावलेली ११ कुलूपे कटरने बेकायदेशीरपणे कापून सदर मिळकतीचा बेकायदेशीर कब्जा घेण्याचा प्रयत्न केला, त्यावेळचा संपुर्ण प्रकार प्रतिवादीने बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात चित्री झालेला आहे. सर्व सीसीटीव्ही छायाचित्रे प्रतिवादीने पेनड्राईव्हमध्ये घेतले आहे.

सदरचा पेनड्राईव्ह दाव्यात दाखल केला आहे. रु.४५,०००/-, काही महत्वाचे कागदपत्रे, खुर्च्या चोरी झाल्या आहेत, कुलूपे तोडून नुकसान केले आहे, त्याची प्रतिवादीने अकलूज पोलीस स्टेशनला तक्रार देण्याचा प्रयत्न केला, परंतु ती तक्रार घेतली नाही. त्यानंतर , परत प्रतिवादीने शटरला पुन्हा स्वतःची १४ कुलूपे आतून व बाहेरुन लावली आहे. त्याच्या चाव्या न्यायालयात जमा केल्या आहेत. त्यामुळे दि.३०/११/२०१८ रोजी घडलेल्या घटनेचा रिपोर्ट पोलीसाकडून मागवून घ्यावा.

३. या अर्जास वादीने नि.क्र.८१ वर म्हणणे दिले आहे. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज नि.५ वर सुनावणी होवून वादीचा नि.क्र.५ चा अर्ज मंजूर करण्यात आला. प्रतिवादीस दावा मिळकतीच्या वादीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादीने दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत हरकत अडथळा करु नये म्हणून ताकीद दिली आहे. त्याविरुध्द प्रतिवादीने माननीय जिल्हा न्यायालय, माळशिरस यांच्याकडे किरकोळ अपील क्र.१४/२०१८ दाखल केले होते, दि.१५/५/२०१८ रोजी ते अपील फेटाळण्यात आले, त्याविरुध्द प्रतिवादीने काही कारवाई केली नाही. दाव्यामध्ये वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादातील मुद्दा हा ताबा आहे, त्यामुळे पुरावा गोळा करण्यासाठी अर्ज करता येणार नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. मी वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादानुसार दि.३०/११/२०१८ ला वादीने, प्रतिवादीच्या दावा मिळकतीतील पत्र्याच्या शटरला असलेले कुलूप कटरच्या साहाय्याने कापून स्वतःची कुलूपे लावली, त्या कुलूपाची नासधुस केली. त्यानंतर परत प्रतिवादीने पोलीसांसमक्ष त्या शटरला स्वतःची कुलूपे लावली व त्याच्या चाव्या न्यायालयात दाखल केल्या, या घटनेचा प्रतिवादीने, पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्याचा प्रयत्न केला, त्याचा पोलीसांनी रिपोर्ट तयार केला, तो रिपोर्ट वादीचा उलटतपास घेण्यासाठी महत्वाचा आहे. याउलट, वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, दि.३०/११/२०१८ रोजी अशी कोणतीही घटना घडली नाही, म्हणून अर्ज नामंजूर करावा.

५. मी संपुर्ण दाव्याचे अवलोकन केले. वादीच्या दावा मिळकतीच्या ताब्यास, प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर मनाई हुकूम वादीने मागितला आहे. दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, दि.३०/११/२०१८ रोजी प्रतिवादीचे दावा मिळकतीवरील पत्र्याच्या शेडला असलेले कुलूप वादीने इतर लोकांशी संगममत करुन कटरने प्रतिवादीचे कुलूप कापले आणि वादीने स्वतःचे कुलूप लावले. त्यानंतर प्रतिवादीने,

पोलीसांच्यासमक्ष त्या पत्र्याच्या शटरला स्वतःचे कुलूप लावले आहे. दाव्यातील वादग्रस्त मुद्दा हा दावा मिळकतीवर ताबा कोणाचा आहे हा आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, दि.३०/११/२०१८ रोजी वर नमुद घटना घडली असेल तर, सदर घटनेचा व वादातील मुद्दयांचा संबंध येतो. प्रतिवादीच्या अर्जातील मजकुराप्रमाणे, पोलीसांसमक्ष दावा मिळकतीतील शटरला स्वतःचे कुलूप लावले, त्याबद्दलचा अहवाल जर पोलीसांनी तयार केला असेल, तर तो अहवाल महत्वाचा ठरु शकतो. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

अकलूज पोलीस स्टेशन अधिकारी यांनी दि.३०/११/२०१८ रोजी दावा मिळकतीत घडलेल्या घटनेचा अहवाल पुढील तारखेपर्यंत सादर करावा.

स्वाक्षरी/-

दिनांक –०७/०२/२०२४.

(यु.व्ही.जोशी)

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माळशिरस.